# पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर

प्लॉट नं.१, सेक्टर-१५, कोळगाव, पालघर-नवनगर,
जिल्हा-पालघर, दुरध्वनी-०२५२५-२५११००(कार्यालय)
E-mail : sp.palghar@mahapolice.gov.in


## -: उमेदवारांना सर्वसाधारण सूचना :-

1) पालघर जिल्हा पोलीस शिपाई भरती 2022-2023 मधील लेखी परीक्षेकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निकाल दि.02.07.2024 रोजी पालघर जिल्हा पोलीस दलाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

2) पालघर जिल्हा पोलीस शिपाई भरती 2022-2023 ची लेखी परीक्षा दि.07/07/2024 रोजी पालघर शहरातील खालील शाळा/महाविद्यालयामध्ये आयोजित केलेली आहे.

| अ.क्र. | शाळा/महाविद्यालयाचे नाव | | एकूण उमेदवार |
|---|---|---|---|
| 1) | सोनोपंत दांडेकर महाविद्यालय, पालघर | नविन इमारत | 560 |

3) लेखी परीक्षेसाठी महाआयटी कडून ओळखपत्र निर्गमित करण्यात आलेले असून, ते https://policerecruitment2022.mahait.org या वेबसाईटवरुन उमेदवारांनी स्वत:चा युजर आयडी व पासवर्डचा वापर करुन प्रवेशपत्र डाऊनलोड करुन स्पष्ट दिसेल अशी प्रिंट काढावी.

4) उमेदवारांनी लेखी परीक्षेकरीता दि.07.07.2024 रोजी सकाळी 08.00वा. त्यांना प्रवेश पत्रामध्ये वर नमूद केलेल्या परीक्षाकेंद्रावर महाआयटी मार्फतीने पाठविण्यात आलेले लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र घेवून वेळेत उपस्थित रहावे.

5) उमेदवारांनी स्वत:ची ओळख पटविण्यासाठी शासनाने जारी केलेले आधारकार्ड/पॅनकार्ड/मतदान कार्ड/ पासपोर्ट महाविद्यालयीन ओळखपत्र, ड्रायव्हिंग लाईसेन्स यापैकी कोणतेही मुळ आणि वैध ओळखपत्र पासपोर्ट साईज 2 फोटो व ऑनलाईन प्रवेशपत्राची प्रत (हॉल तिकीट) सोबत आणावे अन्यथा प्रवेश दिला जाणार नाही.

6) उमेदवाराने परीक्षा केंद्रावर प्रवेश केल्यानंतर हजेरी पटावर (Attendance Sheet) समक्ष स्वत:चा फोटो चिटकवून त्यापुढील रिकाम्या जागेमध्ये पर्यवेक्षकांच्या समक्ष स्वत:ची स्वाक्षरी करावी.

7) लेखी परीक्षावेळी उमेदवाराने अनावश्यक व मौल्यवान वस्तु आणू नयेत. आणल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील.

8) लेखी परीक्षावेळी उमेदवारांनी मोबाईल फोन, डिजीटल डायरी, मायक्रो फोन, कॅलक्युलेट, नोट पॅड, नोट्स पुस्तके, इयर फोन, ब्ल्यु टूथ, स्मार्ट वॉच, तसेच इतर इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे प्रतिबंधक वस्तु स्वत: जवळ बाळगणे पूर्णत: मनाई आहे. अशा वस्तु उमेदवारांकडे आढळून आल्यास त्यास त्याच क्षणी बाद ठरवून त्याची उमेदवारी रद्द करण्याबरोबरच कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

9) एखादा उमेदवार लेखी परीक्षेला गैरहजर राहीला तर, त्याला पुन्हा लेखी परीक्षा घेण्याबाबत कोणतीही अतिरिक्त संधी देण्यात येणार नाही. त्यास संपूर्ण भरती प्रक्रियेमधून अपात्र ठरविण्यात येईल.

10) उमेदवाराने पोलीस भरती प्रक्रियेमध्ये उध्दट गैरवर्तन / अनुचित प्रकार केल्यास किंवा इलेक्ट्रॉनिक उपकरणे वापरण्याचा, कॉपी करण्याचा अथवा डमी उमेदवार बसविण्याचा प्रयत्न केल्यास त्यास त्याचक्षणी भरती प्रक्रियेमधून बाद करुन कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

11) पोलीस भरतीमध्ये नियमबाहय दबाव तसेच भ्रष्ट आचरण व वर्तणूक करणा-या उमेदवारास अपात्र घोषित करण्यात येईल.

12) लेखी चाचणी दरम्यान उमेदवारास कोणत्याही प्रकारची शारीरिक इजा / नुकसान झाल्यास उमेदवार स्वत: जबाबदार राहील.

13) उमेदवार अगर त्यांचे नातेवाईक यांनी कोणत्याही एजंट / दलाल, अधिकारी / कर्मचारी यांच्या भूलथापांना / अमिषाला बळी पडू नये. उमेदवाराची निवड ही सर्व निकष व गुणवत्तेच्या पात्रतेवर होईल.

14) पालघर जिल्हा पोलीस शिपाई भरती प्रक्रीया ही तटस्थपणे / नि:पक्षपातीपणे व पारदर्शक (Natural, Impartial & Transparent) होणार असून दक्षता अधिकारी म्हणून मा.विशेष पोलीस महानिरीक्षक, कोंकण परिक्षेत्र यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

15) पोलीस भरती प्रक्रीया कालावधीत भ्रष्टाचारी प्रवृत्तीच्या लोकांकडून तसेच बोगस दलालांकडून किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीकडून ओळखीचा गैरफायदा घेवून व तसे ओळखीचे अगर अन्य प्रकारचे अमिष दाखवून कोणी पैशाची मागणी करीत असेल किंवा आर्थिक देवाण-घेवाणीचे गैरव्यवहार होत असल्याचे निदर्शनास आल्यास याबाबतची तक्रार 1) लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर (संपर्क क्र.9082645711) 2) पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे (संपर्क क्र.022-25427979) 3) पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर (संपर्क क्र.9769832478) यापैकी कोणत्याही ठिकाणी संपर्क साधण्यात यावा.

16) लेखी परीक्षा झाल्यानंतर उत्तरसुची (Answer Key) त्याच दिवशी प्रसिध्द करण्यात येईल. उमेदवारांना उत्तरसुची संदर्भात काही शंका / आक्षेप असल्यास त्याबाबत त्यांचे आक्षेप / हरकती त्यांनी उत्तरसुची (Answer Key) प्रसिध्द केल्यानंतर 24 तासात sp.palghar@mahapolice.gov.in या पालघर पोलीस संकेतस्थळावर नोंदवावेत.

17) परीक्षेमध्ये नैसर्गिक अपत्तीमुळे किंवा काही अपरिहार्य कारणास्तव कोणत्याही बाबतीत बदल करण्याचे झाल्यास ते अधिकार पोलीस भरती निवड मंडळाकडे राखुन ठेवण्यात येत आहेत.

18) उमेदवारांनी पोलीस भरती 2022-2023 मधील लेखी परीक्षेसंदर्भातील सर्व सुचना व आवश्यक माहिती जाणुन घेण्याकरीता पालघर जिल्हा पोलीस दलाचे संकेतस्थळावर वेळोवेळी खात्री करावी.

OS TO SUPDT. OF POLICE, PALGHAR

पोलीस उप अधीक्षक (गृह) पालघर